# करू मैत्री मराठीशी

## इयत्ता दुसरी



विनामूल्य वितरणासाठी

# टेली मानस हेल्पलाईन

**Tele MANAS (Tele Mental Health Assistance and Networking Across States)**

**(१४४१६ / १८००-८९-१४४१६)**

राष्ट्रीय मानसिक आरोग्य कार्यक्रमांतर्गत टेली मानस ही केंद्र पुरस्कृत योजना महाराष्ट्र राज्यात ऑक्टोबर २०२२पासून राबवण्यात येत आहे. टेली मानस कार्यक्रमांतर्गत हेल्पलाईन क्रमांक १४४१६द्वारे मोफत २४ × ७ एकात्मिक आणि सर्वसमावेशक मानसिक आरोग्य सेवा दिली जाते. यामध्ये विविध मानसिक समस्यांकरिता तज्ज्ञांमार्फत उपचार व समुपदेशन करण्यात येते. टेली मानस हेल्पलाईनवर दूरध्वनी केल्यानंतर आपण दिलेली माहिती ही पूर्णतः गोपनीय राहते, त्यामुळे विद्यार्थ्यांनी निःसंकोचपणे आपल्या समस्या सदर हेल्पलाईन क्रमांकावर दूरध्वनीद्वारे (कॉल करून) सांगाव्यात तसेच मनात असणाऱ्या शंका विचाराव्यात आणि आपल्या समस्येविषयी मदत घ्यावी व दुसऱ्यांनाही मदत घेण्यास सांगावे.

# मनोदर्पण

**मनोदर्पण (८४४८४४०६३२)** ही मोफत दूरध्वनी सेवा जुलै २०२०पासून शिक्षा मंत्रालय यांच्यामार्फत राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद येथील मनोदर्पण कक्षाद्वारे विद्यार्थ्यांना, पालकांना तसेच शिक्षकांना मानसशास्त्रीय मार्गदर्शन व साहाय्य प्रदान करण्यासाठी सकाळी ८ ते संध्याकाळी ८ या कालावधीत आठवड्यातील सर्व दिवस उपलब्ध करून देण्यात आली आहे. विद्यार्थी, पालक व शिक्षक आवश्यक मार्गदर्शन व समुपदेशन घेण्यासाठी या हेल्पलाईनवर देखील दूरध्वनी करू शकतात.

सदर पाठ्यपुस्तक राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांनी तयार केलेल्या अभ्यासक्रम व पाठ्यक्रमानुसार तयार करण्यात आलेले असून त्यांचेमार्फत या पाठ्यपुस्तकाची पडताळणी करण्यात आलेली आहे. शासन निर्णय क्रमांक : अभ्यास–२११६/(प्र.क्र.४३/१६) एसडी–४ दिनांक २५.०४.२०१६ अन्वये स्थापन करण्यात आलेल्या समन्वय समितीच्या दिनांक १९.०५.२०२६ रोजीच्या सभेमध्ये हे पाठ्यपुस्तक शैक्षणिक वर्ष २०२६–२०२७ पासून निर्धारित करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

समग्र शिक्षा

# करू मैत्री मराठीशी

## इयत्ता दुसरी

(हिंदी, उर्दू, कन्नड, गुजराती, सिंधी, तेलुगु, तमिळ, बंगाली माध्यमांच्या शाळांकरिता)



महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे ४११ ००४.

सोबतच्या चौकटीतील Q.R. Code स्मार्टफोनद्वारे स्कॅन केल्यास आपणांस डिजिटल पाठ्यपुस्तक व पाठ्यपुस्तकातील घटकांसंबंधित दृक्, श्राव्य आणि दृक्श्राव्य स्वरूपातील अध्ययन–अध्यापन साहित्य उपलब्ध होईल.

प्रथमावृत्ती : २०२६

© महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे – ४११ ००४.

या पुस्तकाचे सर्व हक्क महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाकडे राहतील. या पुस्तकातील कोणताही भाग संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ यांच्या लेखी परवानगीशिवाय उद्‌धृत करता येणार नाही.

## मराठी भाषा समिती

**श्री. एकनाथ आव्हाड, अध्यक्ष**

डॉ. लता घोलप, सदस्य
श्रीमती राधिका पवार, सदस्य
श्रीमती अनुराधा चव्हाण, सदस्य
डॉ. चित्रा गवारे, सदस्य
श्री. नारायण शिंदे, सदस्य
डॉ. संतोषकुमार राठोड, सदस्य
श्री. देविदास गोसावी, सदस्य
श्रीमती ज्योती वालझाडे, सदस्य
श्रीमती मीरा परोडवाड, सदस्य
डॉ. ज्ञानेश्वर नागरे, अभ्यासक्रम समन्वयक
डॉ. नंदा भोर, अभ्यासक्रम समन्वयक
श्रीमती सविता वायळ, सदस्य सचिव

## गुणवत्ता परीक्षण

डॉ. विद्या नावडकर, गुणवत्ता परीक्षक
श्री. संदिप कुऱ्हाडे, विधी तज्ज्ञ
डॉ. अपूर्वा पणशीकर, CWSN तज्ज्ञ

## संयोजन

**श्रीमती सविता अनिल वायळ**
विशेषाधिकारी, मराठी
**श्री. अशोक बाबुराव तकटे**
सहायक विशेषाधिकारी, मराठी (वि. का.)

## निर्मिती

**श्रीमती मिताली शितप**
प्र. मुख्य निर्मिती अधिकारी
**श्री. संदीप आजगांवकर**
निर्मिती अधिकारी

चित्रकार : मयुरा डफळ, श्री.अजय विभुते
मुखपृष्ठ : मयुरा डफळ
अक्षरजुळणी : भाषा विभाग, पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे.
कागद : ७० जी.एस.एम. क्रिमवोव्ह
मुद्रणादेश : N/PB/2026-27/Qty. 52
मुद्रक : SAP Print Solutions Pvt. Ltd, Palghar

**प्रकाशक**
**श्री. हेमंत बाबर**
प्र. नियंत्रक
पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ,
प्रभादेवी, मुंबई – २५.

## भारताचे संविधान

### उद्देशिका

**आम्ही, भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य** घडविण्याचा व त्याच्या सर्व नागरिकांस:

सामाजिक, आर्थिक व राजनैतिक **न्याय;**
विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा व उपासना यांचे **स्वातंत्र्य;**
दर्जाची व संधीची **समानता;**

निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा व राष्ट्राची एकता आणि एकात्मता यांचे आश्वासन देणारी **बंधुता** प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून;

**आमच्या संविधानसभेत**
आज दिनांक सव्वीस नोव्हेंबर, १९४९ रोजी
**याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित करून स्वत:प्रत अर्पण करीत आहोत.**

## भारताचे संविधान

### भाग ४ क

## नागरिकांची मूलभूत कर्तव्ये

**अनुच्छेद ५१ क**

**मूलभूत कर्तव्ये – प्रत्येक भारतीय नागरिकाचे हे कर्तव्य असेल की त्याने –**

(क) प्रत्येक नागरिकाने संविधानाचे पालन करावे. संविधानातील आदर्शांचा, राष्ट्रध्वज व राष्ट्रगीताचा आदर करावा.
(ख) स्वातंत्र्याच्या चळवळीला प्रेरणा देणाऱ्या आदर्शांचे पालन करावे.
(ग) देशाचे सार्वभौमत्व, एकता व अखंडत्व सुरक्षित ठेवण्यासाठी प्रयत्नशील असावे.
(घ) आपल्या देशाचे रक्षण करावे, देशाची सेवा करावी.
(ङ) सर्व प्रकारचे भेद विसरून एकोपा वाढवावा व बंधुत्वाची भावना जोपासावी. स्त्रियांच्या प्रतिष्ठेला कमीपणा आणतील अशा प्रथांचा त्याग करावा.
(च) आपल्या संमिश्र संस्कृतीच्या वारशाचे जतन करावे.
(छ) नैसर्गिक पर्यावरणाचे जतन करावे. सजीव प्राण्यांबद्दल दयाबुद्धी बाळगावी.
(ज) वैज्ञानिक दृष्टी, मानवतावाद आणि जिज्ञासूवृत्ती अंगी बाळगावी.
(झ) सार्वजनिक मालमत्तेचे जतन करावे. हिंसेचा त्याग करावा.
(ञ) देशाची उत्तरोत्तर प्रगती होण्यासाठी व्यक्तिगत व सामूहिक कार्यात उच्चत्वाची पातळी गाठण्याचा प्रयत्न करावा.
(ट) ६ ते १४ वयोगटातील आपल्या पाल्यांना पालकांनी शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात.

## राष्ट्रगीत

जनगणमन–अधिनायक जय हे
भारत–भाग्यविधाता ।
पंजाब, सिंधु, गुजरात, मराठा,
द्राविड, उत्कल, बंग,
विंध्य, हिमाचल, यमुना, गंगा,
उच्छल जलधितरंग,
तव शुभ नामे जागे, तव शुभ आशिस मागे,
गाहे तव जयगाथा,
जनगण मंगलदायक जय हे,
भारत–भाग्यविधाता ।
जय हे, जय हे, जय हे,
जय जय जय, जय हे ।।

## प्रतिज्ञा

भारत माझा देश आहे. सारे भारतीय माझे बांधव आहेत.

माझ्या देशावर माझे प्रेम आहे. माझ्या देशातल्या समृद्ध आणि विविधतेने नटलेल्या परंपरांचा मला अभिमान आहे. त्या परंपरांचा पाईक होण्याची पात्रता माझ्या अंगी यावी म्हणून मी सदैव प्रयत्न करीन.

मी माझ्या पालकांचा, गुरुजनांचा आणि वडीलधाऱ्या माणसांचा मान ठेवीन आणि प्रत्येकाशी सौजन्याने वागेन.

माझा देश आणि माझे देशबांधव यांच्याशी निष्ठा राखण्याची मी प्रतिज्ञा करीत आहे. त्यांचे कल्याण आणि त्यांची समृद्धी ह्यांतच माझे सौख्य सामावले आहे.

# राज्यगीत

जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा
जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा ।।धृ।।

भिती न आम्हा तुझी मुळी ही गडगडणाऱ्या नभा
अस्मानाच्या सुलतानीला जबाब देती जिभा
सह्याद्रीचा सिंह गर्जतो शिव शंभू राजा
दरी दरीतून नाद गुंजला महाराष्ट्र माझा
जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा ।।१।।

काळ्या छातीवरी कोरली, अभिमानाची लेणी
पोलादी मनगटे खेळती, खेळ जीवघेणी
दारिद्र्याच्या उन्हात शिजला
निढळाच्या घामाने भिजला
देश गौरवासाठी झिजला
दिल्लीचे ही तख्त राखितो, महाराष्ट्र माझा
जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा
जय जय महाराष्ट्र माझा ।।२।।

# प्रस्तावना

बाल मित्रमैत्रिणींनो,

इयत्ता दुसरीत तुमचे स्वागत आहे. या वर्षी 'करू मैत्री मराठीशी' इयत्ता दुसरीचे हे पाठ्यपुस्तक तुम्हांला नव्याने अभ्यासायचे आहे.

इयत्ता पहिलीच्या पाठ्यपुस्तकातून तुम्हांला मराठी भाषेची तोंडओळख झालेली आहेच. श्रवण, भाषण-संभाषण या कौशल्यांवर आधारलेले हे पाठ्यपुस्तक तुम्हांला नक्कीच आवडले असेल. या पाठ्यपुस्तकातून तुम्ही मराठीतील नवीन शब्द, छोटी वाक्ये व संवाद शिकला आहात. तसेच त्याचा वापर दैनंदिन व्यवहारात कोठे आणि कसा करायचा याचीही माहिती तुम्हांला झालेली आहे. शिकलेल्या शब्दांचा व वाक्यांचा तुम्ही नक्कीच सराव केलेला असेल. पाठ्यपुस्तकामध्ये दिलेली गाणीही तुम्ही आवडीने म्हटली असतील.

इयत्ता दुसरीच्या पाठ्यपुस्तकातही तुम्हांला नवीन शब्द, वाक्ये व संवाद दिलेले आहेत. तसेच तुम्हांला आवडतील अशी गाणीही दिलेली आहेत. ही गाणी तुम्हांला साभिनय व तालासुरात म्हणायला नक्कीच आवडतील. पाठ्यपुस्तकातील चित्रवर्णन, चित्रकथा, संवाद, गोष्टी ऐकताना व सांगताना तुम्ही त्यात नक्कीच रमून जाल. पाठ्यपुस्तकातील आकर्षक, बोलकी चित्रे पाहून त्यावरही तुम्ही भरपूर गप्पा माराल.

इयत्ता दुसरीच्या अखेरीस मराठी भाषेतून तुम्ही आत्मविश्वासाने संवाद साधू शकाल अशी आशा आहे. तुम्हा सर्वांना मराठी भाषा शिकण्यासाठी खूप खूप शुभेच्छा!

पुणे

**दिनांक :** १ मे २०२६

**भारतीय सौर :** वैशाख ११, शके १९४८
महाराष्ट्र दिन

(अनुराधा ओक)
संचालक
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व
अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

## इयत्ता दुसरी

### हिंदी, उर्दू, कन्नड, गुजराती, सिंधी, तेलुगु, तमिळ, बंगाली माध्यमांच्या शाळांकरिता

| प्रचलित अभ्यासक्रमातील मराठी भाषेकरिता निश्चित करण्यात आलेली उद्‌दिष्टे | पृष्ठ क्र. |
|---|---|
| (१) सोपी बडबडगीते/कविता/बालगीते ऐकतो व साभिनय म्हणतो. | ५, ८, १२, २०, २३, २७ |
| (२) छोटी गाणी/बडबडगीते/कविता लक्षपूर्वक ऐकतो व त्यातील शब्दांचे बारकावे (शब्दांची पुनरावृत्ती, यमकयुक्त शब्द इत्यादी) समजून घेतो. | ५, ८, १२, २०, २३, २७ |
| (३) परिसरातील विविध आवाज ऐकतो व ओळखतो. (उदा., प्राणी, पक्षी, वस्तू, व्यक्ती इत्यादी) | २६, २७ |
| (४) चित्राच्या साह्याने ८ ते १० वाक्यांपर्यंत असलेल्या गोष्टी लक्षपूर्वक ऐकतो. | १०, ११ |
| (५) चित्राचे स्थूल निरीक्षण करून चित्राबाबत दोन-तीन वाक्यांत बोलतो. | १, १५, १९, २५ |
| (६) चित्रमालिकेतील चित्रे पाहून गोष्टीत पुढे घडणाऱ्या घटनांबाबत अंदाज बांधतो व त्याविषयी बोलतो. | १८, १९ |
| (७) शब्दांच्या अर्थांबाबत चित्रांच्या साह्याने अंदाज बांधतो. | २५, २८ |
| (८) स्वत:विषयी माहिती सांगतो. (उदा., स्वत:चे नाव, शाळेचे नाव, पत्ता, मित्र, आवडता खेळ, आवडता खाद्यपदार्थ इत्यादी) | २, ७, १३ |
| (९) आपल्या कुटुंबातील माहिती सांगतो. (कुटुंबातील व्यक्तींची नावे, नातेसंबंध इत्यादी. आवडते खेळ, खेळणी, वाहने, वस्तू) यांच्याविषयी मित्रांशी बोलतो. | ३, १४, १७ |
| (१०) परिसरातील विविध घटकांविषयी बोलतो. (उदा., प्राणी, पक्षी, वस्तू, खेळ, खेळणी, अवयवांची कार्ये, वाहने इत्यादी) | ४, ९, १७, १८, २२ |
| (११) परिसरातील ठिकाणांविषयी बोलतो. (उदा., गावातील/शहरातील विविध ठिकाणे इत्यादी) | २२, २६ |
| (१२) दैनंदिन जीवनातील संवादात शिष्टाचादर्शक शब्द/वाक्य वापरतो व चांगल्या सवयी यांचे पालन करतो. | १६, १८, २१ |
| (१३) परिसरातील लोकांशी (२ ते ३ वाक्ये) संभाषण करतो. | १५, १८, २१ |
| (१४) दैनंदिन जीवनातील (३ ते ५ शब्द) सूचना समजून घेतो व अनुपालन करतो. | १६, २४ |
| (१५) परिसरातील लोकांशी (४ ते ५ वाक्ये) संभाषण करतो. | १८, २१ |
| (१६) छोट्या संभाषणात सहभागी होतो. | ६, १४ |
| (१७) खेळ, अभ्यास इ. वेळी मित्रांबरोबर विचार, भावना यांची मराठी भाषेतून देवाणघेवाण करतो. | ६, ९, १३, १४, १७ |
| (१८) ऐकलेल्या गोष्टीतील पात्रांची नावे सांगतो. | १०, ११ |
| (१९) विविध व्यावसायिकांशी व्यवहार करताना योग्य प्रकारे संवाद करतो. | १५, १८, २१ |

- अध्यापनाद्‌वारे विद्यार्थ्यांकडून वर दिल्याप्रमाणे किमान उद्‌दिष्टे साध्य करून घेणे अनिवार्य आहे. उद्‌दिष्टांच्या समोर दिलेल्या पृष्ठक्रमांकाच्या व्यतिरिक्त इतर पृष्ठक्रमांकांवर दिलेल्या आशयाद्‌वारे देखील इतर उद्‌दिष्टे साध्य होऊ शकतात, असा प्रयत्न शिक्षकांनी करावा.

## पाठ्यपुस्तकात समाविष्ट केलेली प्रतीके



बघ.



ऐक व म्हण.



म्हण.



ऐक.



कृती कर.

# अनुक्रमणिका

## भाग – १


| | | |
|---|---|---|
| १. | पाऊस (चित्रवर्णन) | १ |
| २. | माझी ओळख | २ |
| ३. | माझे कुटुंब | ३ |
| ४. | माझे अवयव | ४ |
| ५. | या रे या सारे या (गाणे) | ५ |
| ६. | चला, चित्र काढू या. | ६ |
| ७. | भाज्यांचे महत्त्व | ७ |
| ८. | फुलपाखरा (गाणे) | ८ |
| ९. | आमचे खेळ | ९ |
| १०. | दोघांचे भांडण तिसऱ्याचा लाभ (चित्रकथा) | १० |
| ११. | पणत्या लावू (गाणे) | १२ |
| १२. | माझे मित्र | १३ |
| १३. | संवाद साधू या. | १४ |


## भाग – २


| | | |
|---|---|---|
| १४. | आनंदमेळावा (चित्रवर्णन) | १५ |
| १५. | चांगल्या सवयी | १६ |
| १६. | उद्यान | १७ |
| १७. | मदतनीस | १८ |
| १८. | हत्तीची युक्ती (चित्रकथा) | १९ |
| १९. | झोपाळा (गाणे) | २० |
| २०. | आपला व्यवसाय | २१ |
| २१. | शहर | २२ |
| २२. | पंखा (गाणे) | २३ |
| २३. | कृती करू या. | २४ |
| २४. | चित्रशब्द | २५ |
| २५. | आमचा परिसर | २६ |
| २६. | सवंगडी (गाणे) | २७ |
| २७. | चित्रवाचन | २८ |
| ● | शिक्षक व पालकांसाठी सूचना | २९ |
| ● | दिशा अध्ययन–अध्यापनाची | ३० ते ३६ |




**सूचना :** विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांबाबत अध्ययन-अध्यापन प्रक्रिया करताना सांकेतिक खुणांच्या भाषेचा (साईन लँग्वेज) तसेच अन्य पूरक अध्यापन पद्धतींचा वापर करावा. विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांना ज्या पद्धतीने शक्य असेल, त्या पद्धतीने व्यक्त होण्याची संधी द्यावी.

# १. पाऊस (चित्रवर्णन)

भाग–१

चित्र बघ. निरीक्षण कर व सांग.



# २. माझी ओळख

चित्रे बघ. ओळख. ऐक व म्हण. लक्षात ठेव. सराव कर.

नमस्ते,

माझे नाव .................... आहे.

माझ्या शाळेचे नाव .................... आहे.

मी इयत्ता दुसरीत शिकतो.





नमस्ते,

माझे नाव .................... आहे.

मी .................... येथे राहते.

मी इयत्ता दुसरीत शिकते.






# ३. माझे कुटुंब

चित्रे बघ. ओळख. ऐक व म्हण. लक्षात ठेव. सराव कर.











# ४. माझे अवयव

चित्रे बघ. ओळख. ऐक व म्हण. लक्षात ठेव. सराव कर.

हे माझे **कान** आहेत.
मी कानांनी **ऐकतो**.



हे माझे **डोळे** आहेत.
मी डोळ्यांनी **पाहते**.




हे माझे **हात** आहेत.
मी हातांनी **काम करतो**.



हे माझे **पाय** आहेत.
मी पायांनी **चालतो**.



हे माझे **नाक** आहे.
मी नाकाने **वास घेते**.



# ५. या रे या सारे या

ऐक व म्हण.

या रे या सारे या
आनंदाने खेळू या ॥ धृ ॥

या रे या सारे या
ठुमकत ठुमकत चालू या ॥ १॥

हातांचे हे पंख पसरुनी
भुर्रकन उडूनी जाऊ या ॥ २॥

हातांचा करू मोर पिसारा
थुईथुई थुईथुई नाचू या ॥ ३॥

करू हातांचे कान सशाचे
टुणटुण उड्या मारू या ॥ ४॥



बघ, ऐक व म्हण.

| ठुमकत | थुईथुई | टुणटुण |
|---|---|---|

# ६. चला, चित्र काढू या.

चित्रे बघ. ओळख. ऐक व म्हण. लक्षात ठेव. सराव कर.






# ७. भाज्यांचे महत्त्व

चित्रे बघ. ओळख. ऐक व म्हण. लक्षात ठेव. सराव कर.



# ८. फुलपाखरा

ऐक व म्हण.

फुलपाखरा ये रे ये
अंगण तुझ्यासाठी खुले

अंगणात आहेत हसरी फुले
फुलांसारखीच लाजरी मुले

तुला पाहून डोलणार फुले
बागडणार मग आम्ही मुले



बघ, ऐक व म्हण.

| मुले–फुले–खुले | हसरी–लाजरी |
|---|---|

# ९. आमचे खेळ

चित्रे बघ. ओळख. ऐक व म्हण. लक्षात ठेव. सराव कर.



# १०. दोघांचे भांडण तिसऱ्याचा लाभ

**चित्रे बघ. ओळख. ऐक व म्हण. लक्षात ठेव. सराव कर.**

एका गावात दोन मांजरी राहत होत्या. त्या दोघी खूप चांगल्या मैत्रिणी होत्या. एके दिवशी त्यांना लोण्याचा एक गोळा सापडला. लोण्याच्या गोळ्यासाठी दोघींचे भांडण सुरू झाले.




दोघींचे भांडण ऐकून माकड आले. ते दोघींना समजावू लागले.



माकडाने तराजू आणला. त्याने लोण्याच्या गोळ्याचे मुद्दाम दोन असमान भाग केले.




असे करत करत माकडाने बरेच लोणी खाऊन टाकले.




माकडाने आपल्याला फसवले.
ते मांजरींच्या लक्षात आले.








मांजर


लोणी


माकड


तराजू

# ११. पणत्या लावू

ऐक व म्हण.

पणत्या लावू एक दोन
अंधाराला भितंय कोण?

पणत्या लावू तीन चार
झगमग झगमग, घरदार

पणत्या लावू पाच सहा
रांगोळ्यांची मौज पाहा

पणत्या लावू सात आठ
चालणाऱ्याला दिसेल वाट

पणत्या लावू नऊ दहा
दिवाळी बाई इथेच राहा



बघ, ऐक व म्हण.

चार–दार     सहा–पाहा     दहा–राहा

# १२. माझे मित्र

चित्रे बघ. ओळख. ऐक व म्हण. लक्षात ठेव. सराव कर.



















तुझ्या मित्रांची/मैत्रिणींची नावे सांग.

# १३. संवाद साधू या.

चित्रे बघ. ओळख. ऐक व म्हण. लक्षात ठेव. सराव कर.






# १४. आनंदमेळावा

भाग–२

चित्र बघ. निरीक्षण कर व सांग.



# १५. चांगल्या सवयी

चित्रे बघ. ओळख. ऐक व म्हण. लक्षात ठेव. सराव कर.



जेवणापूर्वी व जेवणानंतर
हात स्वच्छ धुऊ या.



एकमेकांना मदत करू या.



कचरा नेहमी कचरापेटीत टाकू या.



मोठ्या व्यक्ती भेटल्यावर
'नमस्ते' म्हणू या.



मित्रमैत्रिणींसोबत एकत्र जेवण करू या.



आपल्या वस्तू नेहमी जागेवर ठेवू या.

# १६. उद्यान

चित्रे बघ. ओळख. ऐक व म्हण. लक्षात ठेव. सराव कर.



# १७. मदतनीस

चित्रे बघ. ओळख. ऐक व म्हण. लक्षात ठेव. सराव कर.






# १८. हत्तीची युक्ती

चित्रे बघ. ओळख. ऐक व म्हण. लक्षात ठेव. सराव कर.











काय घडले असेल ?

# १९. झोपाळा

ऐक व म्हण.



झू झू झोपाळा
नेऊ चला आभाळा

झोपाळ्यावर बसू
खुदुखुदु हसू

झोका जाई झरझर
वारा येई भरभर

झोका जाई उंच
हाती येई चिंच

गाऊ छान गाणी
बाळे आम्ही गुणी

बघ, ऐक व म्हण.

| | | | |
|---|---|---|---|
| बसू–हसू | उंच–चिंच | आभाळा–झोपाळा | झरझर–भरभर |

# २०. आपला व्यवसाय

चित्रे बघ. ओळख. ऐक व म्हण. लक्षात ठेव. सराव कर.



# २१. शहर

चित्र बघ. निरीक्षण कर व सांग.



# २२. पंखा

ऐक व म्हण.




पंखा फिरतो
गरगर
हवा देतो
भरभर



हवा कशी
थंडगार
पंखा आमचा
हुशार फार



कधी फिरतो
हळूहळू
म्हणतो दमलो
कसा पळू?

बघ, ऐक व म्हण.

| गरगर | भरभर | हळूहळू |
|---|---|---|

# २३. कृती करू या.

चित्रे बघ. ओळख. ऐक व म्हण. लक्षात ठेव. सराव कर.



उडी मार.



टाळ्या वाजव.



गोल गिरकी घे.



हात वर कर.



डोळे बंद कर.



पुस्तक उघड आणि पाठ वाच.



पेन्सील घे आणि वहीत लिही.

# २४. चित्रशब्द

चित्रे बघ. ओळख. ऐक व म्हण. लक्षात ठेव. सराव कर.



खिडकी





कपाट



संगणक



पंखा



दरवाजा




पुस्तक





खडू



बाक



फळा



वही

# २५. आमचा परिसर

चित्रे बघ. ओळख. ऐक व म्हण. लक्षात ठेव. सराव कर.



हे बसस्थानक आहे.
येथे खूप बस असतात.
या बस विविध ठिकाणी जातात.



हे विमानतळ आहे.
येथे खूप विमाने असतात.
विमान हवेत उडते.




हा दवाखाना आहे.
आजारी लोक येथे येतात.
डॉक्टर त्यांना औषधे देतात.



हे टपाल कार्यालय आहे.
येथे पत्रे जमा करतात.
पोस्टमन काका पत्रे देतात.

ऐक व म्हण.

# २६. सवंगडी

कोंबडा करतो, कुकुचकू
रडू नको बाळा, हस रे तू

मोती करतो, भोऽ भोऽ
माझ्याशी बाळा, खेळ रे तू

मांजर करते, म्यॉवऽ म्यॉवऽ
बाळासोबत, नाचू गाऊ

गाय ओरडे, हंबा हंबा
बाळ हसले, जरा थांबा

बाळ हसता, हसले तारे
फेर धरून, नाचले सारे



बघ, ऐक व म्हण.

कुकूचकू    भोऽ भोऽ    म्यॉवऽ म्यॉवऽ    हंबा हंबा

# २७. चित्रवाचन

चित्रे बघ. ओळख. ऐक व म्हण. लक्षात ठेव. सराव कर.

- हे माझे  आहे.
- हे  आहे.
- ही माझी  आहे.
- ही  आहे.
- ही माझी  आहे.
- ही माझी  आहे.

बघ. ऐक. ओळख व म्हण.



घर




शाळा



छत्री



विमान



बाहुली



आजी

# शिक्षक व पालकांसाठी सूचना

* **सूचना :** हिंदी, उर्दू, कन्नड, गुजराती, सिंधी, तेलुगु, तमिळ, बंगाली या माध्यमांच्या शाळांकरिता तयार करण्यात आलेल्या 'करू मैत्री मराठीशी' या पाठ्यपुस्तकाची रचना ही श्रवण, भाषण-संभाषण या कौशल्यांवर आधारलेली आहे. अमराठी माध्यमांतील विद्यार्थ्यांना शालेय वर्षाच्या शेवटी मराठी भाषेतून भाषण-संभाषणाचे कौशल्य आत्मसात व्हावे या दृष्टीने पाठ्यपुस्तकातील पाठ्यघटकांची रचना करण्यात आलेली आहे. विद्यार्थ्यांच्या घरातील, परिसरातील व त्यांच्या भावविश्वातील विविध घटक व प्रसंग डोळ्यांसमोर ठेवून संवाद तयार करण्यात आलेले आहेत. शालेय वर्षाच्या शेवटी या घटकांशी संबंधित मराठी भाषेतील शब्द विद्यार्थ्यांना आत्मविश्वासाने व अचूकपणे बोलता यावेत या दृष्टीने शिक्षकांनी प्रयत्न करावेत. अमराठी माध्यमांसाठी तयार करण्यात आलेल्या या पाठ्यपुस्तकातील घटकांचे अध्यापन करत असताना शिक्षकांनी पुढील बाबी लक्षात घेणे आवश्यक आहे.
    - शिक्षकांनी प्रत्येक पाठाचे दैनंदिन नियोजन करावे. पाठातील नवीन शब्द व वाक्ये विद्यार्थ्यांना दररोज शिकवावीत. त्यांचा सराव करून घ्यावा. वर्गातील सर्व विद्यार्थ्यांना शिकवलेला भाग पूर्ण येईपर्यंत सराव घ्यावा. अध्यापन केलेल्या नवीन शब्दांचे आकलन झाले का? याची नोंद ठेवावी. त्यानंतरच पुढील भाग शिकवण्यास सुरुवात करावी.
    - प्रत्येक पाठातील घटकांची विद्यार्थ्यांच्या भावविश्वाशी सांगड घालून विद्यार्थ्यांना बोलते करावे.
    - प्रत्येक पाठातील नवीन शब्द, संवाद हे स्पष्ट उच्चारणांसह ऐकवावेत.
    - विद्यार्थ्यांनी ऐकलेले शब्द मागे म्हणण्यास सांगून त्यांचा वारंवार सराव करून घ्यावा.
    - पाठातील औपचारिक व अनौपचारिक संवाद यांचा वापर प्रत्यक्ष दैनंदिन जीवनात करण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन द्यावे. विद्यार्थी पाठ्यपुस्तकाव्यतिरिक्त दिलेल्या शब्दांचे योग्य उच्चार करतो का? ते तपासावे.
    - प्रत्येक नवीन पाठ सुरू करत असताना विद्यार्थ्यांकडून पूर्वी शिकवलेल्या पाठांतील विविध शब्द, वाक्ये, संवाद यांचे दृढीकरण होण्यासाठी विद्यार्थ्याने ते किती आत्मसात केले त्याच्या नोंदी ठेवाव्यात.
    - पाठांमधील सूचना ऐकून व त्यांचा अर्थ ओळखून विद्यार्थ्यांकडून कृती करून घ्याव्यात.
    - पाठ्यपुस्तकामध्ये समाविष्ट करण्यात आलेली गाणी विद्यार्थ्यांकडून योग्य उच्चारांसह, आरोह-अवरोहासह तसेच साभिनय म्हणून घ्यावीत.
    - पाठांमध्ये आलेले विविध शिष्टाचार पाळण्यासंबंधी विद्यार्थ्यांना सूचना द्याव्यात. तसेच सदर शिष्टाचार पाळण्यासंबंधी मराठी शब्दांचा वापर कसा करावा याचे वेळोवेळी मार्गदर्शन करावे.
    - शब्दांमधील ध्वनिभेद लक्षात घेऊन विद्यार्थी उच्चारण करतात का? यांकडे जाणीवपूर्वक लक्ष द्यावे.
    - विद्यार्थ्यांकडून वैयक्तिक व सामूहिक स्वरूपात मराठीतून संवाद साधण्यासंदर्भात वर्गामध्ये विविध कृती करून घ्याव्यात.
    - विद्यार्थी त्यांच्या शब्दांमध्ये संवाद साधण्याचा प्रयत्न करत असतील, तर त्यांना प्रोत्साहन द्यावे. तसेच त्यांना योग्य तेथे मार्गदर्शन करावे व त्या शब्दांना मराठीमधील शब्द सांगून त्यांचे उच्चारण करून घ्यावेत.
    - विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तकात समाविष्ट करण्यात आलेल्या चित्रकथेतील चित्रांचे निरीक्षण करण्यास सांगावे. चित्रकथेतील चित्रे व प्रसंग यांबाबत त्यांना उत्स्फूर्तपणे बोलण्यासाठी प्रेरित करावे.
    - श्रवण व भाषण-संभाषणाच्या दृष्टीने दृक्श्राव्य साधनांचा (मोबाईल, प्रोजेक्टर, टी.व्ही. इत्यादी.) शक्य तेथे वापर करावा.

## दिशा अध्ययन-अध्यापनाची

**प्रत्येक पाठाखाली दिलेल्या कृती क्रमाने घ्याव्यात. याशिवाय आपल्या कल्पकतेने काही कृती वैयक्तिक तसेच गटागटांत घेता येतील.**

### १. पाऊस

(१) विद्यार्थ्यांना पाठातील चित्रांचे निरीक्षण करण्यास सांगावे.

(२) चित्रात कायकाय दिसत आहे ते विचारावे (स्वभाषा स्वीकारावी.)

(३) विद्यार्थ्यांनी सांगितलेल्या शब्दांना मराठी भाषेतील शब्द सांगावेत. हे शब्द त्यांच्याकडून म्हणून घ्यावेत.

(४) चित्रातील गोष्टी व त्यांच्यासाठी मराठी भाषेतील शब्द अशी कार्डे तयार करून विद्यार्थ्यांकडून ते शब्द ओळखण्याचा सराव करून घ्यावा.

(५) चित्रातील व्यक्ती काय करत आहेत याबद्दलची वाक्ये सोप्या भाषेत सांगावी व विद्यार्थ्यांकडून म्हणून घ्यावीत.

जसे- (१) मुले पाण्यात होडी सोडत आहेत.
(२) एक मुलगा छत्री घेऊन जात आहे.
(३) एका मुलाने लाल रेनकोट घातला आहे.
(४) रस्त्यावर पावसाचे पाणी वाहत आहे.
(५) आजोबांच्या डोक्यावर इरले आहे.

(६) वरील वाक्ये विद्यार्थ्यांकडून म्हणून घ्यावीत.

(७) नियमितपणे वाक्ये म्हणण्याचा सराव करून घ्यावा.

### २. माझी ओळख

(१) विद्यार्थ्यांना पाठातील चित्रांचे निरीक्षण करण्यास सांगावे. चित्रांचे त्यांच्या शब्दांत वर्णन करण्यास सांगावे.

(२) विद्यार्थ्यांना पाठातील संवाद ऐकवावेत. ऐकलेले संवाद मागे म्हणण्यास सांगावेत.
उदा., नमस्ते, माझे नाव रिया आहे.

(३) विद्यार्थ्यांना पाठातील संवादांच्या आधारे त्यांची ओळख करून देण्यास सांगावी.

(४) विद्यार्थ्यांचे गट करावेत. गटांमध्ये आपापल्या मित्रमैत्रिणींचे नाव सांगून एकमेकांची ओळख करून देण्यास सांगावे.

(५) पाठातील या कृतींचा व संवादांचा अधिकाधिक सराव करून घ्यावा.

### ३. माझे कुटुंब

(१) विद्यार्थ्यांना पाठातील चित्रांचे निरीक्षण करण्यास सांगावे. चित्रांमध्ये घडणाऱ्या कृतींबाबत चर्चा करावी.

(२) पाठामधील मुलगा आपल्या कुटुंबाची ओळख करून देत आहे. त्याप्रमाणे प्रत्येक विद्यार्थ्यांकडून आपापल्या कुटुंबातील व्यक्तींची ओळख करून देण्यास सांगावी.

(३) विद्यार्थ्यांकडून पाठातील संवादांचा सराव करून घ्यावा.
उदा., ही माझी आजी आहे.
तिचे नाव कांता आहे.

(४) विद्यार्थ्यांना आजी, आजोबा, आई, बाबा हे चित्रशब्द दाखवून यांवर आधारित विविध वाक्ये म्हणून घ्यावीत.

(५) विद्यार्थ्यांना कुटुंबातील व्यक्तींबद्दल विविध प्रश्न विचारावेत.
उदा., तुझ्या कुटुंबात कोणकोण आहेत?
या प्रकारे विद्यार्थ्यांना त्यांची नावे विचारावीत. विविध प्रश्न विचारून मराठीमध्ये उत्तर देण्याकरिता मार्गदर्शन करावे.

### ४. माझे अवयव

(१) विद्यार्थ्यांना पाठातील चित्रांचे निरीक्षण करण्यास सांगावे. चित्रांतील कृतींची ओळख करून द्यावी.

चित्रांतील कृतींमध्ये काय दाखवले आहे याबद्दल विविध प्रश्न विचारावेत.

(२) पाठातील चित्रांमध्ये दाखवल्याप्रमाणे विविध अवयवांची व अवयवांच्या कार्यांची ओळख करून द्यावी.

उदा., हे माझे डोळे आहेत.

मी डोळ्यांनी पाहते.

वरीलप्रमाणे पाठातील सर्व वाक्ये विद्यार्थ्यांकडून म्हणून घ्यावीत.

(३) कान, डोळे, हात, पाय, नाक या अवयवांच्या नावांची व कार्यांची ओळख करून द्यावी.

(४) कान, डोळे, हात, पाय, नाक यांप्रमाणे इतर अवयवांची प्रत्यक्ष ओळख करून द्यावी. उदा., डोके, जीभ, पाठ, पोट, बोटे, तोंड, दात इत्यादी.

(५) अवयवांची व त्यांच्या कार्यांची ओळख करून द्यावी. कान-ऐकणे, डोळे-पाहणे यांप्रमाणे अवयवांची व त्यांच्या कार्यांची ओळख करून देण्यास सांगावी.

## ५. या रे या सारे या

(१) शिक्षकांनी गाणे तालासुरात साभिनय म्हणावे.

(२) विद्यार्थ्यांना गाण्यातील चित्राचे निरीक्षण करण्यास सांगावे.

(३) विद्यार्थ्यांना गाण्यातील शब्द व चित्र ओळखण्यास सांगावे. उदा., मोर, घर, मुले, ढग, पक्षी, झाड इत्यादी.

(४) विद्यार्थ्यांना ओळखता न आल्यास या शब्दांची चित्रे स्वत: दाखवावीत.

(५) गाण्यातील थुईथुई तसेच टुणटुण या शब्दांशी संबंधित कृती करून दाखवाव्यात व करून घ्याव्यात. तसेच या शब्दांचे उच्चार करून घ्यावेत. इतर ध्वनिदर्शक शब्दांचे उच्चार करून घ्यावेत. जसे- टणटण, खणखण, छनछन इत्यादी.

(६) परिसरात असलेल्या विविध प्राण्यांचे व पक्ष्यांचे आवाज तंत्रज्ञानाच्या मदतीने विद्यार्थ्यांना ऐकवावे. तसेच प्रत्यक्ष अनुभूती द्यावी.

(७) गाण्याची एकेक ओळ तालासुरात साभिनय म्हणून दाखवावी.

(८) विद्यार्थ्यांना गाण्याच्या ओळी मागे म्हणण्यास सांगाव्या.

(९) विद्यार्थ्यांकडून गाणे वैयक्तिक व सामूहिक स्वरूपात म्हणून घ्यावे.

## ६. चला, चित्र काढू या.

(१) विद्यार्थ्यांना पाठातील चित्रांचे निरीक्षण करण्यास सांगावे. चित्रामध्ये घडणाऱ्या कृतींबाबत चर्चा करावी.

(२) चित्रांत घडत असणाऱ्या प्रसंगांचे त्यांच्या शब्दांत वर्णन करण्यास सांगावे.

(३) विद्यार्थ्यांना पाठातील संवाद ऐकवावेत. ऐकलेले संवाद मागे म्हणण्यास सांगावेत.

(४) विद्यार्थ्यांकडून गटात या संवादाचे सादरीकरण करून घ्यावे.

(५) संवाद सादरीकरणाचा अधिकाधिक सराव करून घ्यावा.

## ७. भाज्यांचे महत्त्व

(१) विद्यार्थ्यांना पाठातील चित्रांचे निरीक्षण करण्यास सांगावे.

(२) पाठातील संवाद विद्यार्थ्यांना ऐकवावेत. विद्यार्थ्यांकडून संवाद मागे म्हणून घ्यावेत.

(३) परिसरातील विविध ठिकाणी घडणारे छोटे छोटे संवाद विद्यार्थ्यांना ऐकवावेत. पाठात आलेले संवाद समजावून सांगावेत. तसेच पाठातील संवादाचा सराव करून घ्यावा.

(४) विद्यार्थ्यांना पालेभाज्या व फळभाज्या यांच्या नावांची ओळख करून द्यावी. त्यांचे महत्त्व सांगावे. विद्यार्थ्यांना कोणती भाजी, खाद्यपदार्थ आवडतात याबाबत चर्चा करावी. आवडती भाजी, आवडते खाद्यपदार्थ विचारावेत. योग्य तेथे मार्गदर्शन करावे.

(५) विद्यार्थ्यांना माहिती जाणून घेण्यासाठी प्रश्न कसे विचारले जातात हे सांगावे. तसेच प्रसंगानुरूप प्रश्नाचे बदललेले उत्तर कसे असते ते सांगावे.

## ८. फुलपाखरा

(१) शिक्षकांनी विद्यार्थ्यांना गाणे तालासुरात साभिनय म्हणून दाखवावे.
(२) विद्यार्थ्यांना गाण्यातील चित्रांचे निरीक्षण करण्यास सांगावे. चित्रातील विशेष गरजा असणाऱ्या मुलांबाबत अधिक चर्चा करावी.
(३) गाण्यातील चित्र व शब्द ओळखण्यास सांगावे. उदा., फुले, फुलपाखरे, मुले, झाडे.
(४) विद्यार्थ्यांना चित्रे ओळखता न आल्यास ती चित्रे स्वत: दाखवावीत.
(५) विद्यार्थ्यांकडून गाण्यातील यमक शब्द म्हणून घ्यावेत.
उदा., मुले-फुले-खुले, हसरी-लाजरी.
(६) विद्यार्थ्यांना गाण्याची एकेक ओळ तालासुरात साभिनय म्हणून दाखवावी.
(७) विद्यार्थ्यांना गाण्याच्या ओळी मागे म्हणण्यास सांगावे.
(८) विद्यार्थ्यांकडून गाणे वैयक्तिक व सामूहिक स्वरूपात म्हणून घ्यावे.
(९) विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांना आवश्यक तेथे मार्गदर्शन करावे.

## ९. आमचे खेळ

(१) विद्यार्थ्यांना पाठातील चित्रांचे निरीक्षण करण्यास सांगावे.
(२) पाठातील चित्रांतील संवाद ऐकवावेत. तसेच पाठामधील संवाद म्हणून घ्यावेत.
(३) विद्यार्थ्यांशी खेळाच्या आवडीबाबत चर्चा करावी. विविध खेळांची नावे सांगावीत.
(४) खेळात वापरल्या जाणाऱ्या इतर वस्तू दाखवून त्यांच्या नावांची ओळख करून द्यावी.
(५) विद्यार्थ्यांना खेळांच्या आवडीनिवडीबाबत प्रश्न विचारावेत. त्याप्रमाणे खेळांच्या नावांचे उच्चार करून घ्यावेत.
(६) खेळताना एखादी वस्तू घेण्यासाठी पूर्वपरवानगी घ्यावी ही बाब विद्यार्थ्यांच्या लक्षात आणून द्यावी.

## १०. दोघांचे भांडण तिसऱ्याचा लाभ

(१) विद्यार्थ्यांना चित्रकथेतील चित्रांचे निरीक्षण करण्यास सांगावे.
(२) विद्यार्थ्यांना चित्रकथा ऐकवावी व त्याबाबत गप्पा माराव्यात.
(३) विद्यार्थ्यांना चित्रकथेतील चित्र दाखवून त्यातील संवाद ऐकवावेत व म्हणून घ्यावेत.
(४) विद्यार्थ्यांना चित्रकथेतील शब्दांची व वाक्यांची ओळख करून द्यावी. शब्दांचे, वाक्यांचे उच्चारण करून घ्यावे.
(५) विद्यार्थ्यांना तंत्रज्ञानाच्या साहाय्याने विविध चित्रकथा ऐकवाव्यात.
(६) विद्यार्थ्यांना चित्रकथा उत्स्फूर्तपणे सांगण्यासाठी प्रेरित करावे.
(७) विद्यार्थ्यांकडून चित्रकथेचे नाट्यीकरण करून घ्यावे.

## ११. पणत्या लावू

(१) शिक्षकांनी गाणे तालासुरात व साभिनय म्हणावे.
(२) गाण्यातील चित्रांचे निरीक्षण करण्यास सांगावे.
(३) गाण्यातील शब्द-चित्र ओळखण्यास सांगावे. उदा., पणती, आकाशकंदील, रांगोळी.
(४) विद्यार्थ्यांना चित्रे ओळखता न आल्यास ती चित्रे स्वत: दाखवावीत.
(५) विद्यार्थ्यांकडून यमक शब्दांचे उच्चार करून घ्यावेत. उदा., चार-दार, सहा-पाहा.
(६) विद्यार्थ्यांना गाण्याची एकेक ओळ तालासुरात साभिनय म्हणून दाखवावी.
(७) विद्यार्थ्यांना गाण्याच्या ओळी मागे म्हणण्यास सांगावे.
(८) विद्यार्थ्यांकडून गाणे वैयक्तिक व सामूहिक स्वरूपात म्हणून घ्यावे.

## १२. माझे मित्र

(१) विद्यार्थ्यांना चित्रांचे निरीक्षण करण्यास सांगावे.
(२) विद्यार्थ्यांना पाठातील चित्रे व त्यावर आधारित संवाद म्हणून दाखवावेत.

(३) विद्यार्थ्यांकडून पाठातील संवादाचे उच्चारण करून घ्यावे.

(४) विद्यार्थ्यांना पाठात आलेल्या नवीन शब्दांची माहिती करून द्यावी. नावांचा मराठीत परिचय करून द्यावा.

(५) विद्यार्थ्यांना चित्रकार्डाद्वारे पाठातील शब्दांची माहिती करून द्यावी.

(६) विद्यार्थ्यांकडून हे शब्द सांगण्याचा अधिकाधिक सराव करून घ्यावा.

## १३. संवाद साधू या.

(१) विद्यार्थ्यांना पाठातील चित्रांचे निरीक्षण करण्यास सांगावे. चित्रांत कोणकोण दिसत आहे ते विचारावे.

(२) विद्यार्थ्यांकडून पाठातील संवाद मागे म्हणून घ्यावेत.

(३) विद्यार्थ्यांना दैनंदिन जीवनातील विविध प्रसंगांवर आधारित संवाद ऐकवावेत.

(४) विद्यार्थ्यांना संवादातील आजी, ताई, दादा यांच्या संवादांच्या ध्वनिफिती ऐकवाव्यात.

(५) पाठातील संवादांचा अधिकाधिक सराव करून घ्यावा.

(६) विद्यार्थ्यांकडून आजी-नातू, बहीण-भाऊ यांच्यातील संवादवाक्ये म्हणून घ्यावीत.

(७) विद्यार्थ्यांकडून आई-मुलगा, बाबा-मुलगी यांच्यातील संवाद वाक्यांचा सराव करून घ्यावा.

(८) पुस्तकाऐवजी वस्तूंची नावे घेऊन संवाद सादरीकरण करून घ्यावे.

उदा., वही, पेन, पट्टी, पेन्सील इत्यादी.

## १४. आनंदमेळावा

(१) विद्यार्थ्यांना पाठातील चित्राचे निरीक्षण करण्यास सांगावे.

(२) विद्यार्थ्यांना चित्रात कायकाय दिसत आहे ते विचारावे. (स्वभाषा स्वीकारावी.)

(३) विद्यार्थ्यांनी सांगितलेल्या शब्दांना मराठी भाषेतील शब्द सांगावेत. हे शब्द त्यांच्याकडून म्हणून घ्यावेत.

(४) चित्रातील गोष्टी व त्यांच्यासाठी मराठी भाषेतील शब्द अशी चित्रशब्दकार्डे बनवून विद्यार्थ्यांकडून ते शब्द ओळखण्याचा सराव करून घ्यावा.

(५) चित्रातील मुले, व्यक्ती कायकाय करत आहेत याबद्दलची वाक्ये सोप्या भाषेत सांगावीत व विद्यार्थ्यांकडून म्हणून घ्यावीत.

उदा., (१) चित्रात खाऊची विविध दुकाने आहेत.
(२) मुले खेळणी विकत घेत आहेत.
(३) पालक मुलांसोबत खरेदी करत आहेत.
(४) शिक्षक मुलांना मदत करत आहेत.
(५) मुले आनंदाने मैदानावर खेळत आहेत.

(६) प्रत्येक विद्यार्थ्यांकडून वरील वाक्ये म्हणून घ्यावीत.

(७) विद्यार्थ्यांकडून नियमितपणे वाक्ये म्हणण्याचा सराव करून घ्यावा.

## १५. चांगल्या सवयी

(१) विद्यार्थ्यांना चित्राचे निरीक्षण करण्यास सांगावे.

(२) चित्रातील कृतींबाबत चर्चा करावी. (स्वभाषा स्वीकारावी.)

(३) प्रत्येक विद्यार्थ्याकडून चित्राखालील वाक्ये सांगून म्हणून घ्यावीत.

(४) विद्यार्थ्यांना चित्रातील कृतींबद्दल विविध प्रश्न विचारावेत.

उदा., (१) कचरा कोठे टाकावा?
(२) मोठी व्यक्ती भेटल्यावर तुम्ही त्यांना काय म्हणता?

अशा प्रकारे विद्यार्थ्यांना विविध प्रश्न विचारून मराठीमध्ये उत्तरे देण्याकरिता मार्गदर्शन करावे.

(५) विद्यार्थ्यांकडून चांगल्या सवयींसाठी मराठी सूचनांचा अधिकाधिक सराव करून घ्यावा.

## १६. उद्यान

(१) विद्यार्थ्यांना चित्राचे निरीक्षण करण्यास सांगावे.

(२) विद्यार्थ्यांना चित्रावर आधारित संवाद ऐकवावेत.

(३) विद्यार्थ्यांकडून पाठातील सूचना म्हणून घ्याव्यात व कृती करून घ्याव्यात.

(४) विद्यार्थ्यांकडून पाठातील संवादाचे सादरीकरण करून घ्यावे.

(५) विद्यार्थ्यांना चित्रातील खेळण्यांची ओळख करून द्यावी. त्याविषयी माहिती सांगावी.
जसे- घसरगुंडी, झोका.

(६) विद्यार्थ्यांना त्यांच्या भावविश्वातील इतर खेळण्यांची माहिती द्यावी.

(७) विद्यार्थ्यांनी पाहिलेल्या, अनुभवलेल्या उद्यानाविषयी त्यांच्याशी गप्पा माराव्यात. विद्यार्थ्यांना बोलते करावे.

(८) विद्यार्थ्यांना पाठातील संवाद म्हणून दाखवावेत.

(९) संवादाचा अधिकाधिक सराव करून घ्यावा.

## १७. मदतनीस

(१) विद्यार्थ्यांना पाठातील चित्रांचे निरीक्षण करण्यास सांगावे.

(२) विद्यार्थ्यांना पाठातील चित्रांवर आधारित संवाद म्हणून दाखवावेत. संवादांचे सादरीकरण करून घ्यावे.

(३) विद्यार्थ्यांकडून एक किलो, दोन किलो यांप्रमाणे मराठी अंकांचा व शब्दांचा वापर करून सराव घ्यावा. दैनंदिन जीवनातील शिष्टाचारदर्शक शब्दांचा सराव करून घ्यावा.

(४) विद्यार्थ्यांना दहा रुपये, वीस रुपये दाखवून या नोटांची नावे सांगावीत. विद्यार्थ्यांना नोटांची नावे उच्चारण्यास सांगावीत.

(५) विद्यार्थ्यांना दैनंदिन व्यवहारात पैशांच्या वापराबाबतची माहिती द्यावी.

(६) विद्यार्थ्यांना परिसरातील लोकांशी संभाषण करण्यास प्रेरित करावे.

## १८. हत्तीची युक्ती

(१) विद्यार्थ्यांना चित्रकथेतील चित्रांचे निरीक्षण करण्यास सांगावे. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना चित्रकथा ऐकवावी.

(२) विद्यार्थ्यांना चित्रकथेतील पात्रे विचारावीत. पात्रांची मराठी नावे सांगावीत व म्हणून घ्यावीत. शिक्षकांनी चित्र व त्याबद्दलची वाक्ये अशी कार्डे स्वत: तयार करावीत.

(३) चित्रकथेतील कथेबद्दलचा अंदाज बांधण्यासाठी विविध प्रश्न विचारावेत. त्यांच्याकडून स्वभाषेतील उत्तरे स्वीकारावीत.

(४) सांगितलेल्या वाक्यांबद्दल योग्य तिथे मार्गदर्शन करावे. गोष्टीत शेवट काय घडत असेल ते विचारावे. त्याबाबतची त्यांची उत्तरे ऐकून घ्यावीत.

(५) मराठीतून उत्तरे सांगण्यासाठी प्रेरित करावे.

(६) विद्यार्थ्यांना चित्रकथेतील घटना क्रमाने सांगण्यास प्रेरित करावे.

(७) चित्रकथेचे नाट्यीकरण करून घ्यावे.

## १९. झोपाळा

(१) विद्यार्थ्यांना गाणे तालासुरात, साभिनय ऐकवावे व म्हणून घ्यावे.

(२) विद्यार्थ्यांना कवितेतील चित्रांचे निरीक्षण करण्यास सांगावे. चित्रातील झोपाळा दाखवून झोपाळा शब्दाचे उच्चारण करण्यास सांगावे.

(३) विद्यार्थ्यांकडून यमक शब्दांचा सराव करून घ्यावा.

(४) विद्यार्थ्यांकडून कवितेत आलेल्या शब्दांचा सराव करून घ्यावा.
जसे- झोपाळा- आभाळा
बसू- हसू
झरझर- भरभर
गाणी- गुणी

(५) विद्यार्थ्यांना परिसरातील इतर उपलब्ध खेळण्यांची ओळख करून द्यावी.

(६) विद्यार्थ्यांना बडबडगीते, बालगीते, तंत्रज्ञानाच्या साहाय्याने ऐकवावीत.

## २०. आपला व्यवसाय

(१) विद्यार्थ्यांना चित्रांचे निरीक्षण करण्यास सांगावे.

(२) चित्रातील विविध कृतींबद्दल चर्चा घडवून आणावी.

(३) विद्यार्थ्यांना पाठातील चित्रांवर आधारित संवाद म्हणून दाखवावेत. संवादांचे सादरीकरण करून घ्यावे.

(४) विद्यार्थ्यांकडून अर्धा लीटर, एक लीटर याप्रमाणे मराठी अंकांचा व शब्दांचा सराव करून घ्यावा.

(५) विद्यार्थ्यांना नोटा दाखवून नोटांची नावे सांगावीत. विद्यार्थ्यांना नोटांची नावे उच्चारण्यास सांगावे.

(६) विद्यार्थ्यांना दैनंदिन व्यवहारात पैशांच्या वापराबाबतची माहिती द्यावी.

(७) विद्यार्थ्यांकडून दे-द्या, घे-घ्या यांचा व शिष्टाचाराच्या शब्दांचा योग्य सराव करून घ्यावा.

## २१. शहर

(१) विद्यार्थ्यांना चित्रांचे निरीक्षण करण्यास सांगावे.

(२) चित्रातील विविध घटकांविषयी चर्चा करावी. (स्वभाषा स्वीकारावी.)

(३) चित्रातील विविध घटकांची माहिती करून द्यावी. तसेच त्यासाठी वापरल्या जाणाऱ्या विविध शब्दांची ओळख करून द्यावी. उदा., उंच इमारत, बँक, एटीएम, जलतरण तलाव, सिनेमागृह, उद्यान इत्यादी.

(४) विद्यार्थ्यांना चित्रातील विविध वाहनांचे आवाज ऐकवावेत.

(५) विद्यार्थ्यांनी अनुभवलेल्या विविध घटनांबाबत त्यांच्याशी गप्पा माराव्यात.

(६) विद्यार्थ्यांना चित्रातील घटकांबाबत मराठी शब्द सांगण्यासाठी प्रेरित करावे.

(७) विद्यार्थ्यांकडून चित्र-शब्द कार्डाद्वारे अधिक शब्द सांगण्याचा सराव करून घ्यावा.

## २२. पंखा

(१) शिक्षकांनी गाणे तालासुरात म्हणून घ्यावे.

(२) गाण्यातील चित्रांचे निरीक्षण करण्यास सांगावे.

(३) गाण्यातील चित्र व शब्द ओळखण्यास सांगावे. उदा., पंखा, मुलगा, खिडकी, पडदा, खुर्ची, मुलगी, पुस्तक, ठोकळे

(४) विद्यार्थ्यांना ओळखता न आल्यास या शब्दांची चित्रे स्वत: दाखवावीत. विद्यार्थ्यांकडून गरगर, हळूहळू या शब्दांशी संबंधित कृती करून दाखवाव्यात. तसेच शब्दांचे उच्चारण करून घ्यावे.

(५) गाण्याची एकेक ओळ तालासुरात साभिनय म्हणून दाखवावी.

(६) विद्यार्थ्यांना गाण्याच्या ओळी मागे म्हणण्यास सांगाव्यात.

(७) विद्यार्थ्यांकडून गाणे वैयक्तिक व सामूहिक स्वरूपात म्हणून घ्यावे.

## २३. कृती करू या.

(१) विद्यार्थ्यांना चित्राचे निरीक्षण करण्यास सांगावे. चित्रातील विद्यार्थी जी कृती करत आहेत, ती करण्यास सांगावी. त्या कृतीचे नाव सांगावे.

(२) विद्यार्थ्यांना पाठातील कृतीसाठी वापरण्यात आलेली सूचना ऐकवावी व त्याप्रमाणे कृती करण्यास सांगावी.

(३) पाठातील विविध कृती वैयक्तिक व सामूहिक स्वरूपात करून घ्याव्यात.

(४) विद्यार्थ्यांना पाठात दिलेल्या कृतींप्रमाणे उडी मार, टाळ्या वाजव, गोल गिरकी घे, डोळे बंद कर यांसारख्या विविध कृती स्वत: करून दाखवाव्यात. सदर कृतींची नावे सांगावीत. तसेच या कृती नियमितपणे करून घ्याव्यात.

## २४. चित्रशब्द

(१) विद्यार्थ्यांना चित्रांचे निरीक्षण करण्यास सांगावे.

(२) चित्र व त्यासाठीचा मराठीमधील शब्द सांगावा व या शब्दांचे उच्चार करण्यास सांगावे.

(३) चित्र व चित्रशब्द यांच्या कार्डांद्वारे शब्द ओळखण्याचा खेळ घ्यावा.

(४) चित्र दाखवून परिचित व अपरिचित शब्द सांगण्याचा अधिकाधिक सराव करून घ्यावा.

## २५. आमचा परिसर

(१) विद्यार्थ्यांना चित्राचे निरीक्षण करण्यास सांगावे.
(२) परिसरातील विविध ठिकाणे चित्रांच्या मदतीने अथवा प्रत्यक्ष दाखवून त्यावर चर्चा करावी.
(३) विद्यार्थ्यांना चित्राद्वारे विविध घटकांची माहिती करून द्यावी. तसेच त्यासाठी वापरल्या जाणाऱ्या विविध शब्दांची ओळख करून द्यावी.
तेथील विविध वाहनांचे आवाज ऐकवावेत.
उदा., बसस्थानक, विमानतळ, दवाखाना, टपाल कार्यालय.
(४) परिसरात उपलब्ध असलेल्या ठिकाणास भेट देऊन विद्यार्थ्यांना बोलण्यास प्रेरित करावे.
(५) विद्यार्थ्यांना पाठातील वाक्ये ऐकवावीत.
(६) परिसरातील विविध वाहनांचे आवाज ऐकवावेत.
(७) विद्यार्थ्यांनी अनुभवलेल्या घटनांबाबत त्यांच्याशी गप्पा माराव्यात.
(८) विद्यार्थ्यांना छोटी वाक्ये बोलण्यासाठी प्रेरित करावे.
उदा., (१) हे बसस्थानक आहे.
(२) डॉक्टर औषधे देतात.
(३) पोस्टमनकाका पत्रे देतात.
(४) विमान हवेत उडते.
(९) विद्यार्थ्यांकडून मराठीतून सोपी वाक्ये बोलण्याचा सराव करून घ्यावा.

## २६. सवंगडी

(१) शिक्षकांनी गाणे तालासुरात साभिनय म्हणावे.
(२) विद्यार्थ्यांना गाण्यातील चित्राचे निरीक्षण करण्यास सांगावे.
(३) गाण्यातील प्राण्यांच्या व पक्ष्यांच्या आवाजांच्या नकला करून दाखवाव्यात. तसेच विद्यार्थ्यांकडून करून घ्याव्यात.
(४) आवाजाची नक्कल दर्शवणारे शब्द (ध्वनिदर्शक शब्द) म्हणून घ्यावेत.
उदा., कुत्रा- भोऽ भोऽ
मांजर- म्याँव म्याँव
गाय- हंबा हंबा
कोंबडा- कुकुचकू
(५) विद्यार्थ्यांना गाण्याव्यतिरिक्त विविध प्राणी व पक्षी यांची चित्रे दाखवावीत. विविध प्राणी व पक्षी यांच्या आवाजांच्या नकला करून दाखवाव्यात. विद्यार्थ्यांकडून त्यांना माहिती असलेल्या विविध प्राणी व पक्षी यांच्या आवाजांच्या नकला करून घ्याव्यात.
(६) विद्यार्थ्यांना तंत्रज्ञानाच्या मदतीने विविध प्राण्यांचे व पक्ष्यांचे आवाज ऐकवावेत.
(६) विद्यार्थ्यांना एकेक ओळ ऐकवावी व म्हणून घ्यावी.
(७) गाण्यातील शब्द वापरून वाक्य तयार करण्यास सांगावे. वाक्य तयार करण्यासाठी योग्य तेथे मार्गदर्शन करावे.

## २७. चित्रवाचन

(१) विद्यार्थ्यांना चित्राचे निरीक्षण करण्यास सांगावे.
(२) चित्रासाठी वापरला जाणारा मराठी शब्द सांगावा.
(३) वाक्यातील चित्राऐवजी योग्य शब्द घेऊन वाक्य वाचून दाखवावे. विद्यार्थ्यांकडून त्याप्रमाणे वाक्य म्हणून घ्यावे.
(४) चित्र व शब्दकार्डे दाखवून प्रत्येक शब्द ओळखण्याचा सराव करून घ्यावा.
(५) याप्रमाणे विविध चित्रशब्दकार्डे तयार करून छोटी छोटी वाक्ये सांगण्याचा सराव नियमितपणे करून घ्यावा.

प्रिय विद्यार्थी मित्रांनो आणि मैत्रिणींनो,

जर तुम्हांला कोणी अयोग्य रीतीने स्पर्श केल्यामुळे तुम्ही अस्वस्थ झाला असाल, तर तुम्ही अजिबात गप्प बसू नका. अशी घटना घडल्यास, तुम्ही खालील गोष्टी करणे आवश्यक आहे.

१) स्वतःला दोष देऊ नका.

२) तुमचा ज्यांच्यावर विश्वास आहे, त्यांना घडलेल्या घटनेबद्दल सांगा.

३) तुम्ही पोक्सो ई-बॉक्सद्वारे तुमच्या हक्कांच्या संरक्षणासाठी स्थापन केलेल्या राष्ट्रीय आयोगाला देखील कळवू शकता.

**जेव्हा तुम्हांला कोणी अयोग्यरीत्या स्पर्श करतो, तेव्हा तुम्हांला वाईट वाटू शकते, तुम्ही गोंधळून जाऊ शकता, तुम्हांला असहाय्य वाटू शकते; पण तुम्हांला 'वाईट' वाटण्याचे काहीच कारण नाही, कारण यात तुमचा दोषच नाही.**




**हे बटण दाबा.**

**POCSO हा e-box ncpcr@gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे.**

**जर तुमचे वय १८ वर्षांपेक्षा कमी असेल. तुम्हांला कोणी त्रास दिला असेल आणि तुम्ही गोंधळलेले असाल, पीडित असाल, तणावात असाल अथवा अशा प्रकारचा त्रास सहन करणारे कोणी मूल तुमच्या माहितीत असेल, तर १०९८ (दहा नऊ आठ) ला संपर्क साधा. त्यामुळे आपले व मित्रांचे जीवन बदलू शकते.**

CHILD LINE 1098 NIGHT & DAY

**चाइल्ड लाइन १०९८ (दहा नऊ आठ) : ही एक २४ तास टोल फ्री राष्ट्रीय आपत्कालीन फोन सेवा आहे. महिला आणि बालविकास मंत्रालयातर्फे, पीडित मुलांसाठी राबवला जाणारा, चाइल्ड लाइन फाउंडेशनने सुरू केलेला हा उपक्रम आहे.**

नए समाज की ओर
Towards a new dawn

- **विद्यार्थ्यांना चांगला स्पर्श आणि वाईट स्पर्श ओळखण्यासाठी त्यांच्या वयोगटांनुसार शारीरिक आणि भावनिकदृष्ट्या मार्गदर्शन करावे.**

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

करू मैत्री मराठीशी इयत्ता दुसरी

(हिंदी, उर्दू, कन्नड, गुजराती, सिंधी, तेलुगु, तमिळ, बंगाली माध्यमांच्या शाळांकरिता)

समग्र शिक्षा

Samagra Shiksha

( विनामूल्य वितरणासाठी )

